REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख ६ सप्टेंबर, १९५० अंक ३६

श्री—श्री—श्री—श्री—श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री—श्री—श्री—श्री—श्री

दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडश कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**गांवठी कौलांचा तुटवडा**—खेडेगांवांतील घरांना लागणाऱ्या कौलांचा द. हिंदुस्थानांत तुटवडा पडूं लागला आहे. ह्याचें कारण जुन्या तऱ्हेच्या कुंभाराच्या चाकाच्या पद्धतीनें उत्पादन पुरेसें होत नाहीं असें आढळून आलें आहे. म्हैसूर सरकारनें कौलाच्या उत्पादनाची एक नवीन पद्धत शोधून तिचा प्रसार करण्याचें ठरविलें आहे.

**तिसऱ्या वर्गाचे नवे डबे**—भारताच्या रेल्वेवर तिसऱ्या वर्गासाठीं लवकरच जोडण्यांत येणारे डबे संपूर्णपणें धातूंचे बनविलेले आहेत. प्रत्येक डब्यांत ७६ उतारू बसण्याची सोय असून हवा थंड ठेवण्यासाठी २० पंखे बसविलेले आहेत. ह्या डब्यांतून कांहीं खास दिव्यांची सोय करण्यांत आली आहे. हे दिवे ज्या स्टेशनवर मंद प्रकाश असतो त्याच ठिकाणीं लावावयाचे आहेत. हेतु असा कीं, अशा स्टेशनच्या फलाटावर नीट उतरतां यावें. प्रत्येक डब्याला स्वतंत्र डायनॅमो बसविण्यांत आले आहेत.

**सीलोनमध्यें बाटांचा कारखाना**—रबराचे बूट तयार करण्यासाठीं बाटा कंपनीला सीलोनमध्यें कारखाना काढण्याची परवानगी सीलोनचें सरकार देणार आहे. परकीय भांडवलाला सीलोनमध्यें कारखाने काढण्यास परवानगी देऊन देशी धंद्यांना स्पर्धा निर्माण करावी कीं नाहीं, ह्याबद्दल सीलोनच्या सरकारमध्यें मतभेद होते. परंतु अशी परवानगी दिल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास होणार नाहीं, म्हणून ती आतां देण्यांत येणार आहे.

**पोलिओ रोगाचें संशोधन**—भारताप्रमाणें इतर देशांतही पोलिओ ह्या लहान मुलांना होणाऱ्या रोगाच्या सांथी मधूनमधून पसरत आहेत. स्वीडनमध्यें चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत रोग आटोक्यांत आला असें वाटूं लागलें. परंतु गेल्या महिन्यांत सार्थीनें पुन्हां उचल खाल्ली आहे. ह्या रोगाचा प्रसार कसा होतो तें शोधून काढण्यासाठी रोगी मुलांचें रक्त माकडांना टोंचण्यांत येणार आहे. ह्या प्रयोगासाठी ४०० माकडें स्वीडननें मुद्दाम आयात केलीं. इंग्लंडमध्येंही ह्या रोगाचा प्रसार पुन्हां होऊं लागला आहे.

**दारूबंदीचे परिणाम काय होतात?**—संपूर्ण दारूबंदीचे सामाजिक व आर्थिक दृष्ट्या काय परिणाम होतात तें अजमावण्याचे प्रयत्न मुंबई राज्यांत करण्यांत येणार आहेत. ह्या तपासणीसाठीं कांहीं खेडीं आणि गांवें निवडण्यांत येतील. ह्या कामांत मुंबई विद्यापीठाचें स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस ह्या संस्थांचें सहकार्य घेण्यांत येणार आहे. पहिल्या संस्थेनें दारूबंदीच्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीची तपासणी पुरी केली आहे. तद्संबंधींचा अहवाल लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

**रशिआच्या पसंतीचे अमेरिकन बोलपट**—अमेरिकन बोलपटनिर्मात्यांनीं रशिआंत दाखविण्यासाठीं म्हणून ६० अमेरिकन बोलपट रशिआकडे पाठविले होते. रशिअन बोलपट–खात्यानें त्यांपैकीं ११ पसंत केले आहेत व आणखी ३८ चित्रपटांची चांचणीसाठी मागणी केली आहे. पसंत केलेल्या चित्रपटांत 'टारझानस् न्यूयॉर्क ॲडव्हेंचर' हा बोलपट आहे. अमेरिकन चित्रपट–निर्मात्यांना ३,५०,००० पौंड घेऊन २० चित्रपट रशिआला विकावयाचे आहेत. परंतु रशिआची राजकीय तपासणी कडक असल्यानें फारच थोडे अमेरिकन चित्रपट पसंत केले जातात.

**अमेरिकेचें स्पेनला कर्ज**—अमेरिकेच्या प्रतिनिधी सभागृहानें स्पेनला ६,२५,००,००० डॉलर्स कर्ज देण्याचें बिल मंजूर करून सभागृहाकडे पाठविलें. ह्या कर्जाची मूळची रक्कम १०,००,००,००० डॉलर्स होती; परंतु सभागृहाच्या अध्यक्षांचा इतक्या रकमेला विरोध असल्यानें तडजोड म्हणून वरील रक्कम मान्य करण्यांत आली. प. युरोपीय राष्ट्रांच्या गटांत स्पेनला सामील करून घेण्याची ही पहिली पायरी आहे असें म्हणतात.

**हिंदी अधिकाऱ्याची सीलोनला भेट**—भारताच्या व्यापार खात्याचे चिटणीस सप्टेंबरच्या प्रारंभीं सीलोनला जाणार आहेत. चहाच्या व्यापारासंबंधीं कांहीं धोरण आखतां येईल किंवा काय ह्यासंबंधीं ते चर्चा करणार आहेत असें समजतें. १९५१ च्या मार्चमध्यें लंडनमध्यें चहाच्या व्यापाराला सुरवात होईल. भारत आणि सीलोन ह्या दोन देशांकडून इंग्लंडला चहाचा सगळ्यांत अधिक पुरवठा होतो; म्हणून अशा सहकारी धोरणाला महत्त्व प्राप्त झालें आहे.

**संयुक्त प्रांताची वहा लाखांची बचत**—काटकसर करण्याच्या धोरणास अनुसरून संयुक्त प्रांत सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें यंदा १० लाख रु. ची केली. आहे. नोकरांची कपात करण्यामुळें ५ लाख रु. बचत झाली आहे आणि प्रवासखर्च कमी केल्यामुळें २,६०,००० रु. बचत झाली आहे.

**फ्रान्समध्यें टागोरांचें नाटक**—दक्षिण फ्रान्समधील ड्रुविल ह्या गांवीं यंदाच्या नाट्यमहोत्सवांत डॉ. रविंद्रनाथ टागोर ह्यांचें एक नाटक करण्यांत येणार आहे. नाटकाचें नांव 'अमल आणि राजाचें पत्र' हें आहे. नाटकाचें फ्रेन्च भाषेत भाषांतर करण्यांत आलें आहे. फ्रान्समधील हिंदी वकील नाटक पहाण्यास जाणार आहेत.

**२२ खिसे असलेला कोट**—सिंगापूरमधील एका गोदीचा अधिकारी एका संशयित इसमाची झडती घेत होता. हा इसम चिनी होता आणि तो परवान्याशिवाय सोनें आणीत होता अशी अधिकाऱ्यांना शंका आली होती. झडती घेतां त्याच्याजवळ ६०,००० मलायी डॉलर्सच्या किंमतीचें सोनें सांपडलें. हें सोनें कोटाला मुद्दाम करवून घेतलेल्या २२ चोरखिशांतून त्यानें दडविलें होतें.

**मद्रास राज्यांतील विक्रीकराची वसुली**—मद्रास राज्यांतील विक्रीकराची वसुली ह्या वर्षी जास्तींत जास्त होणार आहे असा अंदाज करण्यांत आला आहे. गेल्या वर्षी राज्याला विक्रीकरापासून १५,२४,००,००० रु. चें उत्पन्न झालें होतें. ह्या वर्षी त्यापेक्षांही अधिक उत्पन्न होईल. शेतकीच्या मालाच्या पहिल्या विक्रीवर जर हा कर बसविण्यांत आला तर जमीन महसूल घेण्याचें कारणच पडणार नाहीं असें मत मद्रासच्या अर्थमंत्र्यांनी व्यक्त केलें आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
दमदरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ६ सप्टेंबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कापडाच्या स्पर्धेऐवजीं दुसरा मार्ग नाहीं काय ?

जपानच्या कापडाची स्पर्धा हा विषय आंतरराष्ट्रीय व्यापारांत कांहीं नवा नाहीं. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानी कापडाची स्पर्धा इंग्लंड–अमेरिकेंतील कापडाच्या कारखानदारांना आणि निर्यात व्यापाराला पुन्हा भेडसावूं लागली आहे. ही स्पर्धा टाळून तिन्ही राष्ट्रांच्या हितसंबंधांचें रक्षण होईल अशी एखादी योजना तयार करतां येईल किंवा काय ह्यासंबंधीं आतां विचार करण्यांत येऊं लागला आहे.

अशी एक सूचना पुढें आणण्यांत आली आहे कीं कापडाच्या बाजारपेठेचे भाग निरनिराळ्या राष्ट्रांना वाटून द्यावे. पण ही सूचना अंमलांत आणणें तितकेंसें सोपें नाहीं. समजा जगांतला एखादा भाग जपानच्या कापडाला बहाल केला तर बाकीच्या कापड निर्यात करणाऱ्या राष्ट्रांनीं त्या भागांतून अजिबात बाहेर पडावयाचें किंवा काय असा प्रश्न उपस्थित होतो. बाकीचे देश असें करण्यास तयार होतील काय ? जगाच्या बाजारपेठांचे असे निरनिराळ भाग पाडले तरी तेथील किंमती काय ठेवावयाच्या ? जपानी कापड इतर देशांच्या कापडापेक्षा स्वस्त पडेल असें गृहीत धरून त्याला कांहीं बाजारपेठा दिल्या तरीही प्रश्न सुटेलच असें नाहीं. ज्या भागांत जपानी कापड आयात केलें जाईल तेथून तें पुन्हा निर्यात केलें जाण्याची शक्यता उरतेच; कारण हे भाग अगर देश स्वस्त जपानी कापड आपल्या देशांत येऊं अगर राहूं देण्यास नाखूष असणें अगदीं शक्य आहे. खुद्द जपानी कापडाच्या कारखानदारांच्या मतांत अलीकडे बदल होऊं लागला आहे. अनिर्बंध स्पर्धा करण्याच्या ते विरुद्ध आहेत. तरी पण प्रत्यक्ष व्यवहारांत या मतपरिवर्तनाचा उपयोग होणें अवघडच आहे.

गिऱ्हाइकाच्या दृष्टीनें विचार करतां स्वस्त जपानी कापड घेणें त्याच्या हिताचें असतें, कारण त्यामुळें गिऱ्हाइकाला आपल्या जवळचा पैसा दुसऱ्या आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी वापरतां येतो. ज्या देशांत जपानी कापड आयात होत असेल, तेथील मूळच्या कापडाच्या धंदेवाल्यांशीं स्पर्धा होऊं लागेल तर त्यांच्याकडून अशा आयातीस विरोध होणेंहि सहाजिक आहे. जपानी कारखानदारांनीं आपल्या कापडाच्या किंमती इतर देशाच्या कापडाच्या किंमतींच्या जवळपास आणल्या तर काय होईल ? जपानी कारखानदारांच्या नफ्यांत वाढ होईल. त्यांच्याजवळ अधिक भांडवल जमा होईल. त्या भांडवलाचा उपयोग करून ते अद्यावत यंत्रसामुग्रीनें सुसज्ज असे नवे उद्योगधंदे काढतील, आणि जगाच्या बाजारपेठांतून स्पर्धा करूं लागतील. जपान शिवाय इतर देशहि कापडाच्या स्पर्धेत उतरूं शकतील हेंही विसरून चालणार नाहीं. जपानच्या रेशमी कापडाची स्पर्धा लक्षांत घेतली पाहिजे. जपानमधून निर्यात होणाऱ्या कापडाची विविधताही कांहीं कमी नाहीं. उत्तम रेशमी कापडापासून तो अगदी बेताच्या कापसाच्या धाग्याच्या कापडापर्यंत सर्व तऱ्हेचें कापड जपान निर्यात करूं शकतें. कापडाचा धंदा हा जपानच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. जपानची वाढती लोकसंख्या लक्षांत घेतां, कापडाच्या धंद्याची कोठलीही बाजारपेठ जपानकडून काढून घेणें त्या देशाच्या दृष्टीनें योग्य ठरणार नाहीं. तात्पर्य, जपानी कापड कारखानदारांची स्पर्धा करण्याची इच्छा नसली तरी इंग्लंड, अमेरिका आणि जपान ह्या सर्व देशांना मानवणारी कापडाची निर्यातविषयक योजना काढणें सोपें नाहीं.

---

### को-ऑपरेटिव्ह न्यूज बुलेटिन

वरील नांवाचें इंग्रजी मासिक बुलेटिन मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला आहे. त्याचा पहिला म्हणजे ऑगस्ट १९५० चा अंक प्रसिद्ध झाला आहे. इन्स्टिट्यूटचें त्रैमासिक वर्षांतून चार वेळा प्रसिद्ध होत असतें, त्यास हें बुलेटिन पूरक होणार आहे. अर्थ-सहकार मंत्रि श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचा संदेश बुलेटिनच्या मुखपृष्ठावर छापला आहे, हें औचित्यपूर्ण आहे. कारण, श्री. मेहता ह्यांचा कों. कार्टलींशीं त्या त्रैमासिकाच्या स्थापनेपासून संबंध असून त्यांच्या नेतृत्वामुळेंच त्याला उच्च दर्जा प्राप्त झालेला आहे. बुलेटिनच्या प्रस्तुत अंकांत प्रथम भारतांतील सहकारी चळवळीची माहिती दिली असून उत्तरार्ध भारताबाहेरील सहकारास वाहिलेला आहे. बुलेटिनचें आम्हीं स्वागत करतों.

---

### संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या भारताच्या वर्गणींत वाढ

संयुक्त राष्ट्रसंघटनेला १९५१ मध्यें भारतानें द्यावयाच्या वर्गणींत थोडीशी (·१६%) वाढ होणार आहे. पाकिस्तानाची वर्गणीहि ·०४% वाढणार आहे. एकूण १४ देशांची वर्गणी वाढणार आहे. ह्या उलट, ९ देशांची वर्गणी कमी होणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या बजेटापैकीं ३८·९२% रक्कम अमेरिका देईल. ग्रेटब्रिटन ११·३७%, फ्रान्स ६%, चीन ६% रशिया ६·९८% असे वर्गणीचे इतर कांहीं आकडे आहेत.

---

### भारत–पाकिस्तान बँकिंग चर्चा

भारत-पाकिस्तान बँकिंग परिषद जालंदर येथें १२ सप्टेंबर पासून पांच दिवस भरणार आहे. पूर्व व पश्चिम पंजाबांत सहकारी बँका व सोसायट्या ह्यांतून निर्वासितांच्या ठेवी पडून राहिल्या आहेत त्याचे संबंधीं परिषदेंत चर्चा होईल.

---

### उत्तर प्रदेशाची लोकसंख्या ६ कोटींवर जाणार

१९४१ मध्यें उत्तर प्रदेशाची लोकसंख्या ५,६३,४६,००० होती ती १९५१ मध्यें ६,२१,६०,००० इतपर्यंत वाढेल असा अंदाज आहे.

---

### भारताचा परराष्ट्रीय व्यापार

भारत सरकारच्या परराष्ट्रीय व्यापाराचा आंकडा १९४९-५० मध्यें १०४३ कोटी रु. वर गेला. निर्गत ४७० कोटी रु. ची झाली व आयात ५६० कोटींची झाली. पुनर्निर्गतीची किंमत १३ कोटी रु. भरली. १९४८–४९ मधील परराष्ट्रीय व्यापारांत भारत–अमेरिका येण्यादेण्यांत ३६ कोटींचीं प्रतिकूल तफावत आली होती; १९४९–५० मध्ये ती फक्त ८३ कोटी झाली.

## जागतिक बँकेच्या कार्याचें स्वरूप

इंटरनॅशनल बँक ऑफ रीकन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपमेंट ह्या बँकेचे सध्या ४८ सभासद आहेत. ह्या बँकेची स्थापना २७ डिसेंबर १९४५ रोजीं होऊन तिच्या आर्टिकल्स ऑफ ॲग्रीमेंटला २८ देशांनीं मान्यता दिली. संयुक्त राष्ट्र संघटनेची एक संस्था म्हणून बँकेला जनरल असेंब्लीनें १५ नोव्हेंबर १९४७ रोजीं मान्यता दिली.

बँकेच्या पहिल्या आर्टिकलमध्यें संस्थेचे हेतू कथन करण्यांत आले आहेतः— (१) सभासद असलेल्या राष्ट्रांची आर्थिक पुनर्घटना आणि विकास करण्यासाठी उत्पादक धंद्यांत भांडवल गुंतविणें हा बँकेचा हेतु आहे. युद्धामुळें उध्वस्त झालेल्या व मुळांतच मागासलेल्या अशा दोन्ही देशांना बँकेकडून साह्य करण्यांत येईल. (२) खाजगी भांडवलाच्या परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणें, त्यासाठी जरूर पडल्यास हमी घेणें अगर भांडवलाशीं भागीदारी पत्करणें. (३) आंतरराष्ट्रीय व्यापाराची समतोल वाढ करणें आणि आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याच्या व्यवहारांत समतोलता राखणें. (४) बँकेनें दिलेल्या अगर हमी घेतलेल्या कर्जाची इतर आंतरराष्ट्रीय कर्जाशीं सांगड घालणें आणि अशा तऱ्हेनें अधिक तांतडीच्या आणि उपयुक्त कामांत भांडवल गुंतविण्याची व्यवस्था करणें.

बँकेचें संचालकत्व बोर्ड ऑफ गव्हर्नर्सकडे आणि कार्यकारी संचालक ह्यांच्याकडे सोंपविण्यांत आलें आहे. बँकेचे सर्व अधिकार बोर्ड ऑफ गव्हर्नर्सकडे देण्यांत आले आहेत. बोर्डाची बैठक वर्षातून एकदां भरते. प्रत्येक सभासद राष्ट्राचा एक प्रतिनिधी बोर्डावर घेण्यांत आला आहे. एकाद्या राष्ट्राचा प्रतिनिधि गैरहजर असल्यास त्याच्या जागीं त्याच राष्ट्राच्या दुसऱ्या प्रतिनिधीला बसतां येतें. बँकेच्या कार्यकारी संचालकांची संख्या १२ ठरविण्यांत आली असून हें संचालक मंडळ बोर्ड ऑफ गव्हर्नर्सला, बँकेच्या सामान्य व्यवहाराबद्दल जबाबदार असतें. बँकेनें मे १९४७ मध्यें कर्जे देण्यास सुरवात केली. पश्चिम युरोपांतील युद्धानें उध्वस्त झालेल्या राष्ट्रांच्या आर्थिक पुनर्घटनेसाठीं प्रथम कर्जे देण्यांत आलीं. १९४८ मध्यें बँकेनें २·८ कोटी डॉलर्सचीं कर्जे दिलीं. ह्या वर्षी कर्जाच्या कारणांत फरक पडलेला दिसून येतो. ह्या वर्षी युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी देण्यांत येणाऱ्या कर्जापेक्षा आर्थिक विकासाच्या नवीन योजनासाठी कर्जे देण्यावर अधिक भर देण्यांत आला. १९४९ सालीं बँकेनें २० कोटी डॉलर्सचीं पतीचीं कर्जे दिलीं. १९४९ च्या डिसेंबर अखेर बँकेनें दिलेल्या कर्जाची एकूण बेरीज ७४,३९,०६,९८३ डॉलर्स इतकी झाली. शिवाय १९५० च्या प्रारंभीं, सभासद राष्ट्रांपैकीं २० राष्ट्रांतील आर्थिक विकासाच्या योजनांबद्दल विचार चालू होता.

प्रारंभापासून ३० जून १९४९ अखेर, बँकेच्या व्यवहारांचा जो आढावा घेण्यांत आला त्यावरून असें दिसून येतें कीं ह्या काळांत बँकेला खर्च वजा जाऊन १,३६,४१,०९४ डॉलर्स वाढावा उरला. बँकेचे सर्व व्यवहार इंटर नॅशनल मॉनिटरी फंडाशीं सुसंगत रीत्या जोडलेले असतात.

**भरवस्तींत गुरें कापण्यास मनाई**—कल्याणमधील फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटनें, सार्वजनिक ठिकाणीं गाई अगर बैल ह्यांची हत्या करण्यास मनाई करणारा हुकूम काढला आहे. गेलीं पंचवीस वर्षे कल्याणमधील खाटीक भरवस्त्यांत अशी हत्या करीत असत असें समजतें.

## हिन्दुस्थान मोटार्स लि.

वरील कंपनीनें ३१ मार्च १९५० अखेर संपलेल्या वर्षी विक्री व कमिशन ह्या रूपानें २,०५,११,७८० रु. मिळविले. १०,००,००० रु. घसारा काढून व ४५,००० रु. करासाठी बाजूला ठेऊन निव्वळ नफा २,९६,०१४ रु. ठरला. कंपनीचें वसूल भांडवल सुमारें ५ कोटी रुपये आहे. इमारती, यंत्रसामुग्री इत्यादींत २½ कोटी रुपये गुंतले आहेत. कंपनीनें २ कोटी रु. सरकारी रोख्यांत ठेवले.

"ॲक्सल, फ्रंट ससपेन्शन्स, इंजिन्स, गिअर बॉक्सेस इ. भागांचें उत्पादन कंपनीच्या कारखान्यांत होऊं लागलें आहे. इतरहीं सुट्या भागांचें उत्पादन हातीं घेण्यांत येत आहे. भारतांत मोटारीस बाजारपेठ मर्यादितच आहे आणि मोटारी जुळवणाऱ्या कित्येक नव्या कंपन्या निघाल्या आहेत. भारतांत तयार केलेली गाडीच प्रत्येक भारतीयानें वापरण्याचें ठरविणें अत्यंत आवश्यक झालें आहे." असें डॉयरेक्टर बोर्डानें आपल्या अहवालांत म्हटलें आहे. कंपनीची वार्षिक सभा २५ सप्टेंबर १९५० रोजीं आहे.

## कॉमनवेल्थ विमा कं. लि., पुणें

वरील कंपनीनें १९४९ मध्यें ४२,५५,००० रु. चे आयुर्विमे पत्करले. गेल्या वर्षीच्या कामापेक्षां हें काम २८% अधिक आहे. फायर खात्याचें उत्पन्न १,२७,१७० रु. झालें. त्यापैकीं ५९,७२८ रु. हप्त्यांच्या पोटीं जमा झाले. कंपनीचें एकूण उत्पन्न १७,९५,४९६ रु. होऊन ८,६७,८४९ रु. ची लाइफ फंडांत भर पडली. आतां तो फंड ९४,९१,३९७ रु. झाला आहे. कंपनीची वार्षिक सभा १४ सप्टेंबर १९५० रोजीं आहे.


# पूर्व खानदेश सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक लि. जळगांव.

मुख्य कचेरी...जळगांव

*तारेचा पत्ता EKCOBANK* *टेलिफोन नं. ५४*

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ९,२६,३०० |
| रिझर्व फंड | रु. ९,३४,३२० |
| इतर फंडस् | रु. ५,९६,४६७ |
| ठेवी | रु. १,५१,११,०७८ |
| खेळतें भांडवल | रु. १,८९,९४,५१५ |
| सहकारी सोसायट्यांना ४ टक्क्यानें दिलेलें कर्ज | रु. ६८,३५,५४१ |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

—शाखा १३—

अमळनेर, भुसावळ, बोदवड, चाळीसगांव, चोपडा, धरणगांव, एरंडोल, फैजपूर, जामनेर, पाचोरा, पारोळा, रावेर, यावल.

—उपशाखा ७—

भडगांव, एदलाबाद, नशिराबाद, निंभोरा, सावदा, शेंदुर्णी, वरणगांव.

व्ही. आर. शिंदे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर.

आर. वाय. सोनवणे, मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबई हायकोर्टाचा निवाडा

# शेअर्स विकले, तरी कंपनींत नोंद करवून घेतली नाहीं

कंपनीच्या लिक्विडेशननंतरचा पेचप्रसंग

(कंपनी कायद्याच्या १५६ व्या कलमाखालील शेअर होल्डरांची जबाबदारी एक्स लेगे ( ex lege ) स्वरूपाची आहे, एक्स कॉन्ट्रॅक्टु ( ex contractu ) नाहीं. कंपनीच्या रजिस्टरवर एकाद्याचें नांव आहे म्हणून तो कॉंट्रिब्युटरी बनतो व त्याची जबाबदारी त्याचेवर येते. "कंपनीचें देणें देण्यास मी बांधलेलों नाहीं कारण माझें नांव रजिस्टरवर असलें तरी मीं शेअर्स विकलेले आहेत. खरेदीदारानें नांव दाखल करून घेतलेलें नाहीं त्याला मी काय करूं ?" असें एकाद्यानें म्हटलें तर तें कायदेशीर होत नाहीं. ३८ व्या कलमाप्रमाणें रजिस्टर दुरुस्त झालें नाहीं, तर १५६ व्या कलमाप्रमाणें त्याचेवर पूर्णपणें जबाबदारी येते. कंपनीनें रजिस्टर दुरुस्त करण्यांत हयगय व विलंब केला, असें स्पष्टपणें दाखविता आलें पाहिजे; तरच उपयोग. न्यायमूर्ति तेंडोलकर ह्यांनीं महमद अकबर अबदुल्ला फाजलभाई ह्यांच्या प्रकरणीं निवाडा केला, त्यावर अपील करण्यांत आलें. न्या. छगला आणि न्या. भगवती ह्यांनीं अपील ऐकून खालील निवाडाच कायम केला. शेअर होल्डर्स पुष्कळ वेळा आपल्या अर्जाचें पुढें काय होतें, ह्याविषयीं निष्काळजी असतात. परंतु, त्याचे परिणाम कांहीं प्रसंगीं घातुक ठरतात. खालील निवाडा ह्या दृष्टीनें मार्गदर्शक होईल ).

महंमद अकबर अबदुल्ला फाजलभाई हे असोसिएटेड बँकिंग कॉर्पोरेशन लि. ( आतां लिक्विडेशनमध्यें ) चे डायरेक्टर होते. त्यांनीं अर्ज केल्यावरून त्यांना १८ ऑगस्ट, १९४२ रोजीं १,००० शेअर्स अ‍ॅलॉट करण्यांत आले. त्यांचा आणखीहि एक शेअर होता, तो मेमॉरँडम ऑफ असोसिएशनवर त्यासाठीं त्यांची सही होती त्या भूमिकेचा होता. फाजलभाईचें म्हणणें असें, कीं कंपनीचे डायरेक्टर होण्यास ५०० शेअर्सच पुरे होते. बाकीच्या ५०० शेअर्सकरता त्यांनीं अर्ज केला, तो डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन कासमअली मुंजी ह्यांच्या विनंतीवरून. हे ५०० शेअर्स मिळतांच, फाजलभाईंनीं कंपनीचे सेक्रेटरी मि. जव्हेरी ह्यांच्या समक्ष कोऱ्या ट्रॅन्स्फर फॉर्मवर सही करून ते मुंजी ह्यांच्या हवाली केले. उरलेले ५०१ शेअर्स आपण ऑगस्ट १९४५ मध्यें विकले, त्याचे आपणांस १८,२८६ रु. ८ आ. मिळाले, असें फाजलभाईचें म्हणणें होतें. ही रकम कासमअली मुंजींनीं दिली. शेअर्स विकतांना कोरे ट्रॅन्स्फर फॉर्म भरून दिले होते. ३० जून १९४५ अखेरच्या वर्षाचें फाजलभाईंना ८९१ शेअर्सवर डिव्हिडंड मिळालें, तेव्हां बँकेंत त्यांनीं चौकशी केली. तेव्हां, कासमअली मुंजींनीं ३०१ शेअर्स स्वतःकडेच ठेवून २०० शेअर्स डॉ. जिवराज मेथा ह्यांना विकले असल्याचें त्यांना आढळून आलें. म्हणून, फाजलभाईंनीं २०० शेअर्सवरील डिव्हिडंडचा चेक डॉ. जिवराज मेथा ह्यांचेकडे व ३०१ शेअर्सवरील डिव्हिडंडचा चेक कासमअली मुंजींचेकडे पाठवून दिला. डॉ. जिवराज मेथा ह्यांना इनकम टॅक्स रिफंडसाठीं सर्टिफिकेट हवें होतें, म्हणून फाजलभाईंनीं बँकेस पत्र लिहून, त्यांचेजवळील ८९१ शेअर्सचें सर्टिफिकेटचीं २००, ३०१ व ३९० शेअर्स ह्याप्रमाणें ४ सर्टिफिकिटें करण्याची विनंती केली. १७ ऑगस्ट १९४६ रोजीं बँकेनें त्याप्रमाणें केलें. फाजलभाईंनीं २०० शेअर्सचें सर्टिफिकेट डॉ. जिवराज मेथांचेकडे व ३०१ शेअर्सचें सर्टिफिकेट कासमअली मुंजींचेकडे पाठवून दिलें.

ह्या ८९१ शेअर्सपैकीं ५०१ शेअर्सखेरीज बाकीचे शेअर्स कोणाला देण्यांत आले, ह्याविषयीं पुरावा कोर्टास समाधानकारक वाटला नाहीं. ह्या ५०१ शेअर्सपैकीं २०० शेअर्सची खरी मालकी डॉ. जिवराज मेथांची व ३०१ शेअर्सची खरी मालकी कासमअली मुंजींची, असें फाजलभाईचेतर्फे प्रतिपादन करण्यांत आलें. फाजलभाईंनीं शेअर्स विकले, त्याची किंमत त्यांना मिळाली, खरेदीदारांना प्रत्यक्ष डिव्हिडंड वॉरंटस् दिलीं, आणि दोघा खरेदीदारांनीं खरेदीदार हें नातें मान्यहि केलें. म्हणून, ह्या शेअर्सवरील रकम वसूल करतांना, त्या दोघांचें नांव कॉन्ट्रिब्यूटरीजच्या यादींत यावयास पाहिजे, कासमअलींचें नको, अशी मागणी हायकोर्टाकडे करण्यांत आली.

कंपनी कायद्याच्या १८४ व्या कलमानें, कोर्टाला वाइंडिंग अप ऑर्डर केल्याबरोबर कॉन्ट्रिब्युटरीजची यादी पक्की करून शेअरहोल्डर्सचें रजिस्टर दुरुस्त करण्याचा अधिकार दिलेला आहे. ३८ व्या कलमाप्रमाणें, रजिस्टर दुरुस्त करतां येतें, तें फक्त खालील प्रसंगीं:—

(१) एकाद्या कंपनीच्या रजिस्टरमध्यें एकाद्याचें नांव जाणूनबुजून किंवा निष्कारण दाखल केलें असल्यास किंवा गाळलें असल्यास; किंवा

(२) एकाद्याचें सभासदत्व नष्ट झाल्यानंतर त्याची नोंद करण्यास निष्कारण विलंब होत असल्यास.

अशा रीतीनें शेअरहोल्डरांच्या रजिस्टरमध्यें दुरुस्ती झाली नाहीं, तर १५६ व्या कलमाप्रमाणें शेअरहोल्डर जबाबदार राहातात. कंपनीच्या रजिस्टरमध्यें ज्याचें नांव असेल, त्याचेवर कॉंट्रिब्यूटरी म्हणून जबाबदारी आलीच.

शेअर्सच्या खरेदीदारांनीं आपलीं नांवें भागीदार म्हणून नोंदवून घेतलीं नाहींत, एवढ्यानें वरील ३८ व्या कलमाचा फायदा मिळूं शकणार नाहीं. कंपनीनें त्याबाबत कसून चौकशी केली, असें सिद्ध झालें पाहिजे. शेअर्सवरील मालकी हक्क बदलल्याची माहिती कंपनीचे चेअरमन किंवा सेक्रेटरी ह्यांना होती, हेंहि पुरेसें नाहीं. कंपनीनें रजिस्टर दुरुस्त करण्यांत हयगय केली, असें सिद्ध करण्यास आणखी बळकट पुरावा पाहिजे. १३ सप्टेंबर १९४५ रोजीं फाजलभाईंनीं बँकेस पत्र लिहून, आपण ५०० शेअर्स विकल्याचें, त्याची किंमत मिळाल्याचें व स्वतः शेअरहोल्डर आतां नसल्याचें कळविलें. ह्यापुढें जाऊन त्यांनीं कांहींच केलें नाहीं. उलट, डिव्हिडंड वॉरंटस स्वीकारलीं. १३ सप्टेंबर १९४५ च्या पत्राप्रमाणें कंपनीनें वागावें अशी फाजलभाईंनीं अपेक्षा तरी कशी केली ? कोणतीहि कंपनी, आपल्या रजिस्टरमध्यें फरक करावयाचा किंवा एकाऐवजी दुसऱ्या शेअरहोल्डराचें नांव घालावयाचें तर त्यासाठीं तिचेकडे योग्य तिकिटाचे व योग्य प्रकारें भरलेले ट्रॅन्स्फर फॉर्म आल्याविना पुढें पाऊल टाकणार नाहीं. ह्या प्रकरणांत, खरेदीदारांनीं कंपनीकडे ट्रॅन्स्फर फॉर्म पाठवलेच नव्हते. खरेदीदार डॉ. जिवराज मेथा व कासमअली मुंजी ह्यांचीं नांवें रजिस्टरवर दाखल करून घेण्यांत कंपनीचेकडून कसूर होऊन विलंब झाला, असें फाजलभाईचेतर्फे सिद्ध होऊं शकलें नाहीं. म्हणून, रजिस्टर दुरुस्त करून देतां येणार नाहीं. त्याचा परिणाम म्हणजे, शेअरहोल्डरांच्या रजिस्टरप्रमाणेंच कॉन्ट्रिब्यूटरीजची यादी पक्की केली जाईल. म्हणून फाजलभाईचें अपिल खर्चासह नामंजूर करण्यांत आलें.

## श्री. भास्करराव जाधव ह्यांनीं सहकारी चळवळीची केलेली सेवा

( श्री. वैकुंठराय ल. मेहता, अर्थ–सहकार मंत्री, मुंबई )

गेल्या जून महिन्याच्या अखेरीला श्री. भास्करराव जाधव दिवंगत झाले. आज जे लोक सहकारी चळवळींत काम करीत आहेत त्यांपैकीं फार थोड्यांना श्री. जाधव ह्यांनीं सहकारी चळवळींत केलेल्या प्रारंभीच्या कामाची माहिती असेल. ह्या त्यांच्या कामाला सुमारें ४० वर्षांपूर्वीं कोल्हापूरला प्रारंभ झाला. तेव्हांपासून जवळ जवळ ३५ वर्षें श्री. जाधव हे प्रां. सहकारी परिषदेला सतत हजर असत. परिषदेच्या कामांत त्यांनीं भाग घेतला नाहीं असें क्वचितच घडलें. त्यांचे ह्या विषयावरील विचार हे स्वतःचा अनुभव आणि अभ्यास ह्यांच्यावर आधारलेले असत. सर्वच सार्वजनिक प्रश्नांकडे व्यवहारी दृष्टीनें पहाणें हा त्यांचा विशेष होता.

श्री. भास्करराव जाधव ह्यांनीं कोल्हापूर व मुंबई येथें कारभार-विषयक अनुभव चांगलाच घेतला होता. मुंबई इलाख्याचे शिक्षण व सहकार–मंत्री म्हणून त्यांनीं कांहीं काळ काम पाहिलेलें आहे. त्यांचें बहुतेक आयुष्य शहरांत गेलें असलें तरी त्यांच्या स्वभावाची ठेवण ग्रामीणच होती. वीस वर्षांपूर्वी तर अशा वृत्तीची फार गरज होती. ग्रामीण विभागांतील जनतेची बाजू घेण्यांत श्री. जाधव ह्यांची वृत्ति नागरी जनतेचा द्वेष करण्याची नव्हती, असेंच मला वाटतें. ग्रामीण जनता ही देशाच्या प्रगतींत महत्त्वाचा भाग घेणारी व्हावी अशी त्यांना तळमळ लागलेली होती. ह्या जनतेची जी पिळणूक चाललेली होती तिला आळा घालावा असा त्यांचा हेतु असावा. जातीय संघटनेचें आकर्षण त्यांना कधींच वाटलें नाहीं. परंतु शेतांत व कारखान्यांत काम करणाऱ्यांनीं आपल्या समान आर्थिक उत्कर्षासाठीं संघटन करावें असें मात्र त्यांना फार फार वाटे. श्री. भास्करराव जाधव हे संस्कारानें व शिक्षणानें लोकशाहीचे पुरस्कर्ते झाले होते. जातिविरहित समाजाची स्थापना झाल्या-शिवाय आपल्या देशाची भरभराट होणार नाहीं हें त्यांनीं ओळखलें होतें. अशा तऱ्हेच्या समाजांतूनच पुढें वर्गरहित समाज निर्माण होईल अशी त्यांची श्रद्धा होती. सहकारी चळवळीविषयीं श्री. जाधव ह्यांना वाटणारें प्रेम सहजस्फूर्त होतें. प्रॉव्हिन्शिअल बँक, प्रॉ. इंस्टिट्यूट अशा संस्थांचे ते सभासद झाले ह्यावरूनच तें दिसून येतें. पुढें त्यांनीं ह्या संस्थांच्या मंडळांवरही कामें केलीं. सर्व प्रश्नांचा विचार ते स्पष्ट रीतीनें करीत असत. आपले विचारही ते उघड तऱ्हेनें बोलून दाखवीत असत. तथापि त्यांनीं आपल्या सहकाऱ्यांना दुखविलें आहे असा प्रसंग मला आठवत नाहीं. ते वयानें माझ्यापेक्षां मागील पिढींतले होते. परंतु वयां-तला हा फरक त्यांनीं माझ्या व त्यांच्या सार्वजनिक संबंधाविषयीं कधींही जाणवूं दिला नाहीं. पुढें पुढें ते सहकारी कार्यांतून निवृत्त झाल्यासारखेच होते. त्यामुळें गेल्या पांच वर्षांत त्यांना भेटण्याचा योग मला फारसा आला नाहीं. तथापि त्यामुळें आमच्या संबंधांत कांहीही फरक पडला नाहीं. त्यांच्या मृत्यू-मुळें मी एका सल्लागाराला, सहकाऱ्याला आणि स्नेह्याला मुकलों आहे असें मला वाटतें.

( बॉ. को. क्वार्टर्ली )

## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें डिप्लोमा परीक्षेचा निकाल

म. स. विद्यालयाच्या सहाव्या शिक्षणक्रमाच्या डिप्लोमा परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. वरील परिक्षेस बसलेल्या एकूण ६२ विद्यार्थ्यांपैकीं एकूण ५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकीं १ ल्या वर्गात ४, २ ऱ्या वर्गात ३९ व ३ ऱ्या वर्गात १२ उत्तीर्ण झाले आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें प्रमाण शे. ८७ टक्के पडतें. नेहमीप्रमाणें विद्यालयानें निकालाची उच्च परंपरा कायम राखली आहे. त्याबद्दल विद्यालयाचे सुपरिंटेंडेंट व अध्यापक वर्ग हे अभिनंदनास पात्र आहेत.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचीं नांवें खालीलप्रमाणें आहेत:–

**पहिला वर्ग**—व्ही. एस. खरे, एन्. एम्. गोंडेगांवकर, ए. एन्. विरनाळे, जी. एन्. सौदत्ती,

**दुसरा वर्ग**—एन्. पी. आळतेकर, एल्. बी. अंबिके, ए. जी. बोडखे, जी. ए. दप्तरदार, एम. एन्. घाटगे, एच्. पी. घाटे, व्ही. के. गोखले, बी. डी. गोसावी, एस. जी. जाधव, एच. एस. जगनाडे, एस्. बी. जांभेकर, एस. व्ही. काजळे, व्ही. डी. करंदी-कर, व्ही. जी. खताळ, एन्. एस. खुंटाळे, ई. एम्. कुलकर्णी, आर. बी. क्षीरसागर, एन्. डी. मगरे, डी. टी. माने, आर. एम्. मराठे, डी. टी. पाडळकर, ए. बी. पाटणकर, बी. बी. पाटील, एकनाथ कमल पाटील, जी. एस्. पाटील, के. बी. पाटील, सोना भिका पाटील, शेनपडु वना पाटील, एम्. एन्. फडतरे, बी. एन्. साळुंखे, व्ही. एम्. साळवे, पी. झेड. शार्दुल, ए. टी. शिंदे, डी. एस. सोनावणे, पी. जी. सुपेकर, एन्. बी. ठुबे, एल्. एम्. वाणी, यु. आर. वसगाडेकर, एल्. व्ही. बनकर.

**तिसरा वर्ग**—आर. व्ही. तेलगू, आर. टी. साळी, के. डी. पाटील, एस. पी. पंचे, व्ही. जी नारखे, ए. एन् कन्नूर, व्ही. डी. जोशी, डी. के. जंगम, आर. ई. घोंगडे, एल्. के. आमणे, एम्. एस. भंडारी, बी. एच्. देवळे.

### श्री. कौशिक ह्यांचा विमान अपघातांत मृत्यू

३० ऑगष्टच्या मध्यरात्रीं कैरो ( इजिप्त ) शेजारीं विमान अपघात झाला. त्यांत श्री. डी. एन्. कौशिक हे मृत्यू पावले. २२ मार्च १९४९ पासून ते मुंबई सरकारचे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज म्हणून काम करीत होते.


## दि कऱ्हाड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराडचे

## –भागदारांस नोटीस–

बँकेच्या भागदारांची तहत्तिसावी वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक १७–९–१९५० रोजीं सकाळीं ७–३० वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. त्या वेळीं बँकेचा सन १९४९–५० चा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, नियमाप्रमाणें डॉयरेक्टर्सची निवडणूक, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक, वगैरे कामें केलीं जातील. डॉयरेक्टर्सचे निवडणुकीबाबत मतें देण्याची वेळ सकाळीं ८ ते दुपारीं १२–३० अशी आहे. तरी सर्व सभासदांनीं येण्याचें करावें अशी विनंति आहे.

कऱ्हाड
दि. १ सप्टेंबर १९५०

शं. पु. कुलकर्णी,
मॅनेजिंग डायरेक्टर

### सांगली विभाग व विलीन दक्षिणी संस्थानें सहकारी परिषद

वरील परिषद् सांगली येथें २६-९-१९४८ रोजीं भरली होती. त्या परिषदेचा त्रोटक वृत्तांत जमाखर्चासह आतां छापून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. परिषद् बोलावण्याच्या कल्पनेस कसें मूर्त स्वरूप आलें तें प्रथम सांगून अहवालांत नंतर स्वागताध्यक्ष श्री. केशवरावजी चोगुले ह्यांचें भाषण, ना. वैकुंठराय ह्यांचें उद्घाटनाचें भाषण, अध्यक्ष ना. यशवंतराव चव्हाण ह्यांचें भाषण, हीं दिलीं आहेत. परिषदेनें मंजूर केलेले २२ ठराव सूचक व अनुमोदक ह्यांच्या नांवासह छापले आहेत. अहवालाचे शेवटीं जमाखर्चाचा तपशील दिला आहे. अशा रीतीनें परिषदेचें असेरचें कामहि उत्कृष्ट रीतीनें पार पाडण्यांत आलें आहे, त्याबद्दल स्वागताध्यक्ष श्री. के. आ. चोगुले व इतर कार्यकर्ते अभिनंदनास पात्र आहेत.

---

### दि कल्याण पीपल्स को. बँक लि.

मागील वर्षापेक्षा अहवालाचे वर्षी ठेवींची खातीं १७५ नें वाढून तीं ८७३ इतकीं झालीं व बँकेचें भांडवल १८ लक्ष, ५५ हजारांचें २६ लक्ष, ५६ हजारांवर गेलें. २,७७,८२० रु. शेअर भांडवल व १,२१,२७७ रु. वेगवेगळे फंड, असें बँकेचें स्वतःचें भांडवल आहे. कोळसा, इमारती लाकूड, चुना, विटा, जळाऊ लाकूड, सुकी मासळी, इत्यादींचे तारणावर बँक कर्ज देऊन एका विशेष रीतीनें कर्जाची सोय करीत आहे आणि प्रांतिक सहकारी बँकेनें १६½ लक्ष रु. चें कॅश क्रेडिट मंजूर करून कल्याण बँकेस धंदा वाढविण्यास मदत केली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस निव्वळ नफा २६,४०२ रु. झाला. ४% डिव्हिडंडला ११,११२ रुपये लागले. (चेअरमन: दौलतराम जयरामराव झुंझारराव. मॅ. डायरेक्टर्स गं. बा. भिडे व पु. मु. पटेल. मॅनेजर : बा. बा. रुद्रभटे)

---

### नगर डि. अ. सें. को. बँक लि.

वरील बँकेचें स्वतःचें भांडवल ३,५१,४६० रु. शेअर भांडवल, १,६१,७०८ रु. रिझर्व्ह फंड, २,८५,७६६ रु. इतर फंड ह्या प्रमाणें एकूण खेळतें भांडवल ६६½ लक्ष रु. आहे. निव्वळ नफा ६९,००५ रु. झाला. ६½ % डिव्हिडंडला १७,२५१ रु. लागतील. कापड खात्यांतील निव्वळ नफा १३,९७२ रु. आहे. मु. प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँकेच्या वतीनें शेतकऱ्यांना सवलतीच्या दरानें लांब मुदतीच्या दिल्या जाणाऱ्या कर्जाचे व्यवहाराकरिता सदर बँकेचे एजंट म्हणून काम करण्यास आवश्यक त्या नियम दुरुस्त्या बँक करीत आहे. (चेअरमन: मो. कुं. फिरोदिया, बी. ए. जनरल मॅनेजर : कृ. ज जोशी. मॅनेजर: त्र्यं. वि. निसळ, सी. ए. आय. आय. बी.)


---

### दि विटा मर्चंटस् को. बँक लि.

अहवालाचे सालचे आदले सालीं ठेवींचे व उलाढालींचें प्रमाण कमी आलें होतें. अहवालाचे वर्षी ती उणीव भरून येऊन कांहीं वाढहि झाली आहे. बँकेचें वसूल भांडवल ८१, ११० रु., फंडस् २९, २६० रु., ठेवी ४,६७,४८२ रु. असे आकडे आहेत. कर्ज येणें ३,१३,२४६ रु. असून इनव्हेस्टमेंट १,७५,३८५ रु. ची आहे. अहवालाचे वर्षी एकूण उलाढाल ३६ लक्ष, ७८ हजार रुपयांची झाली. निव्वळ नफा ७,७३० रु. झाला. ६½% डिव्हिडंडला ५,०४९ रु. लागतील. (चेअरमन: ना. दा. महाजन.)

---


मशिन्स् रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी

१७२, गिरगांव रोड, मुंबई नं. ४.

फोन नं.-२२७३८



**भोर स्टेट बँक लि.**

[स्थापना : १९४४]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.　　न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. वृ. खोले.　　श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलूएल्. बी.　　श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.)
मॅनेजर.



किर्लोस्कर



सेंट्रिफ्युगल पंप

किर्लोस्कर बंधु लिमिटेड. किर्लोस्करवाडी